

**Activity- Wild life Week**

**Date: 3, 4 and 7 October 2024 Time: 1.30 PM Venue: Zoology lab**




**Glims of Competition**






| Inauguration Of wild Life Week | Participating Students for poster, and Photography competition. |
|---|---|
|  |  |













**लोकमत**

# वन्यजीव सप्ताहानिमित्त व्याख्यान, विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**वरवट बकाल :** ऑक्टोबर महिन्याचा पहिला आठवडा हा 'वन्यजीव सप्ताह' म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येतो. यानिमित्त कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागामध्ये व्याख्यान, विविध कार्यक्रम घेण्यात आले.

सप्ताहाचे उद्घाटन ३ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेचे परीक्षक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. निशीगंध सातव होते. ७ ऑक्टोबर रोजी प्रश्नमंजूषा घेण्यात आली. रसायनशास्त्र विभागातील प्रा. किरण साबळे यांनी पर्यवेक्षण केले. दुपारच्या सत्रात सिंदखेडराजा महाविद्यालयाचे प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. महेश तांदळे यांचे व्याख्यान झाले. समारोप कार्यक्रमाला आयक्युएसी समन्वयक डॉ. संजय टाले उपस्थित होते.

Hello Khamgaon
Page No. 4 Oct 12, 2024
Powered by: erelego.com



# कला व वाणिज्य महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा

**संग्रामपूर (प्रतिनिधी):**ऑक्टोबर महिन्याचा पहिल्या आठवडा हा 'वन्यजीव सप्ताह' म्हणुन दरवर्षी साजरा करण्यात येतो. यानिमीत्त कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागामध्ये पोस्टर, फोटोग्राफी स्पर्धा व प्रश्नमंजुषा, अतिथी व्याख्यान यासारखे कार्यक्रम घेण्यात आले. प्रथता: वन्यजीव सप्ताहाचे उदघाटन प्राचार्य डॉ.श्रीराम येरणकर यांच्या हस्ते करण्यात आले. वन्यजीव सप्ताह निमित्त पोस्टर कॉम्पिटिशन व वाइल्डलाइफ फोटोग्राफी ह्या स्पर्धा दिनांक ३ व ४ ऑक्टोंबरला संपन्न झाल्या. डॉ. निशीगंध सातव यांनी निकाल घोषित केला. ७ ऑक्टोबर रोजी प्रश्नमंजुष्या घेण्यात आली. यावेळी प्रा. किरण साबळे यांनी पर्यवेक्षक म्हणुन कार्य पाहिले. दुपारच्या सत्रात प्रा.डॉ.महेश तांदळे यांचे अतिथी व्याख्यान घेण्यात आले. त्यांनी



''वन्यजीव संरक्षण व संवर्धन'' याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना प्लास्टिक मुक्त वातावरण निर्मितीसाठी प्रोत्साहित देखील केले. वन्यजिव सप्ताह समारोपाच्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. महेश तांदळे, आयक्युऐसी समन्वयक डॉ. संजय टाले यांची उपस्थिती लाभली. सप्ताह दरम्यान पोस्टर व फोटोग्राफी, प्रश्नमंजुषा कॉम्पिटिशन यांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राणीशास्त्र विभाग विभागाचे प्रतिनिधी प्रा.डॉ. माधुरी हिंगणकर प्रा.सोनाली तायडे प्रा.सुशील देशमुख प्रा.नम्रता ढोरे व विभाग प्रमुख डॉ. मेघा सोळंके आणि सायन्स क्लबचे प्रतिनिधी डॉ. एन के मोरे, डॉ. विजयानंद इंगळे यांनी प्रयत्न केले. समारोपीय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. निष्ठा बोपले व आभार कु. विनया भामद्रे यांनी केले.

**ACTIVITY: WORKSHOP ON "NEP 2020 - SCHEME OF IMPLEMENTATION FOR THREE /FOUR YEAR UNDERGRADUATE DEGREE"**

**Date: 21 June 2024** **Venue: Seminar Hall**

---

**Participants**: **All faculties, research scholar and student** **Time – 9.30 am**








Felicitation of Guest Dr. Pravin Makode (Associate professor) by Dr. Shriram Yerankar






Some of the memories of workshop

News

पुण्य नगरी

## विद्यापीठाच्या एनईपी निर्देशासंदर्भात जिल्हास्तरीय कार्यशाळा




**संग्रामपूर :** कला व वाणिज्य महाविद्यालयात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या एनईपी निर्देशासंदर्भात एक दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळा २१ जुन रोजी पार पडली.


संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने यावर्षी पासुन पदवी स्तरावर एनईपीनुसार प्रवेश व शिक्षण सुरु करण्या संदर्भात नुकताच आपल्या दिशानिर्देशाचा ड्राफ्ट जारी केला. कार्यशाळा प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. संपन्न झाली. कार्यशाळेला मार्गदशन करण्यासाठी एनईपीमधील तज्ज्ञ तथा प्राणिशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. प्रविण माकोडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात विद्यापीठ गीत गायण व संत गाडगेबाबा यांचे प्रतीमा पुजनाने करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. मेघा सोळंके यांनी केले. डॉ. प्रविण माकोडे यांनी एनईपीचे महत्व विषद केले व पदवीच्या विद्यार्थ्यांना एनईपी कसे उपयोगी राहील, यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी आयक्युएसी समन्वयक डॉ. संजय टाले, डॉ. निशिगध सातव, प्रा.किरण साबळे, प्रा.नागेश इंगळे, डॉ. सतीष राणे, प्रा.सुशिल देशमुख यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन डॉ. निशीगंध सातव व  आभार डॉ.संजय टाले यांनी मानले.

Buldhana Edition

" World Sparrow Day ACTIVITY "

# PROGRAM HELD ON 20/03/25




20:14
fug-rgau-wqa
Dr. Pawan Rathod is presenting
Dr. Pawa...
Irfan ali
You
17 others
Introduction to Birds around us
Dr. Pawan Rathod is presenting
Dr. Pawan Rathod
Irfan ali
You
15 others

दैनिक विदर्भ दस्तक

page 2
27 Mar 2025

# जागतिक चिमणी दिनानिमीत्त प्राणिशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान संपन्न

**संग्रामपूर (प्रतिनिधी)**

स्थानिक कला व वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल येथे जागतिक चिमणी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधुन महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभाग व सायन्स क्लबतर्फे दि. 20 मार्च रोजी अतिथी व्याख्यान संपन्न झाले. सदर व्याख्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले. या व्याख्यानाच्या कार्यक्रमाला प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. मेघा सोळंके ह्या अध्यक्ष म्हणुन उपस्थित होत्या तर अमरावती येथील पक्षी तज्ञ तथा वन्यजीव अभ्यासक डॉ. पवन राठोड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन लाभले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. मेघा सोळंके यांनी केले. महाविद्यालयात दरवर्षी विभागाच्या वतिने राबविण्यात येणारे नवनवीन उपक्रम याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर डॉ. पवन राठोड यांनी आपल्या व्याख्यानातून पक्षांच्या विविध प्रजाती विषयी माहिती दिली. यावेळी पर्यावरणातील पक्षांचा अधिवास, त्यांचे रुपशास्त्र, प्रजनन पद्धती, थलांतर आदी विषयावर संविस्तरपणे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सोनाली तायडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. माधुरी हिंगणकर यांनी केले. आयोजित व्याख्यान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग व सायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यामाने जागतिक चिमणी दिनानिमित्त घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील प्रा. सुशिल देशमुख, प्रा. जया जाधव, प्रा. नम्रता ढोरे व सायन्स क्लबचे डॉ. विजयानंद इंगळे, डॉ. एन के मोरे यांनी मोलाचे सहकार्य केले. या अतिथी व्याख्यानासाठी महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे बहुसंख्य विद्यार्थी आभासी पद्धतीने उपस्थित होते.

# ARTS AND COMMERCE COLLEGE

## Warvat Bakal Dist- Buldana

### Department of Zoology

### Zoology Study Circle 24-25

**Date : 16/08/24** **Time: 2.00 PM** **Venue: Department Of Zoology**




GPS Map Camera
Warwat, Maharashtra, India
2PF4+47X, Warwat, Warwat Bakal, Maharashtra 444202, India
Lat 21.022398°
Long 76.70542°
16/08/24 02:47 PM GMT +05:30
Google


Zoology Study Circle Inauguration 2024-2025
GPS Map Camera
Warwat, Maharashtra, India
2PF4+47X, Warwat, Warwat Bakal, Maharashtra 444202, India
Lat 21.022377°
Long 76.705388°
16/08/24 02:28 PM GMT +05:30
Google


vivo Y200 5G
Shot by Namrata Aug 16, 2024, 14:23

पुण्य नगरी

# प्राणिशास्त्र विभागात अभ्यास मंडळाची स्थापना

**संग्रामपूर,** दि. २२ (प्रतिनिधी)



तालुक्यातील वरवट बकाल येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली.

आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीराम येरणकर तर प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.मेघा सोळंके यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अभ्यास मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.संतोष म्हसाळ, रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नित्यानंद डहाके, प्रा.डॉ.एन के मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रा.म्हसाळ, प्रा. डहाके व प्रा.डॉ.मोरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान प्राणीशास्त्र अभ्यास मंडळातील सदस्यांचे नावे विभाजन करत त्यांच्या नावाची घोषणा विभागप्रमुख प्रा.डॉ.मेघा सोळंके यांनी केली. प्राणीशास्त्र अभ्यास मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रम राबवले जातील, विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवीला पाहीजे असे, जाहिर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.मेघा सोळंके, प्रा.डॉ.माधुरी हिंगणकर, प्रा. सोनाली तायडे. प्रा. सुशील देशमुख तसेच प्रा. नम्रता ढोरे व प्रा.जया जाधव यांनी परिश्रम घेतले.

Buldhana Edition Edition
Aug 23, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com